19 JUL 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडापटूंनी मानसिक तंदुरुस्तीकडे लक्ष द्यावे

## अमेरिकन क्रीडातज्ज्ञ डॉ. फ्रँक व्हेट; विद्यापीठात आंतरराष्ट्रीय क्रीडा वेबिनार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

क्रीडापटूंनी शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक तंदुरुस्तीकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. खेळत असताना उद्भवणाऱ्या ताणतणावांचा सामना जितक्या सहजतेने करता येईल, तितका खेळ उंचावणे शक्य होईल. त्या दृष्टीने प्रशिक्षकांनी त्यांच्या मानसिकतेवर काम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील टेक्सास येथील मिड वेस्टर्न स्टेट विद्यापीठाचे प्राध्यापक व क्रीडातज्ज्ञ डॉ. फ्रँक बी. व्हेट यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ व मीड वेस्टर्न स्टेट युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'कॉम्पिटिटीव्ह स्पोर्टस् अँड ग्लोबल अपॉर्च्युनिटीज' या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनार झाला. याप्रसंगी डॉ. व्हेट 'फिजिऑलॉजिकल थ्रेशोल्ड इन ट्रेनिंग दि कॉम्पिटिटिव्ह स्पोर्टस्'



शिवाजी विद्यापीठातून

विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. व्हेट म्हणाले, भारतीय क्रीडापटू, प्रशिक्षक व मार्गदर्शक हे क्रीडापटूंच्या शारीरिक तंदुरुस्तीवर काम मोठ्या प्रमाणावर करतात. पण त्यांचा भर स्नायूंचा पिळदारपणा, सक्षमतेकडे अधिक असतो. तसे करणे योग्य आहे. मात्र शरीरातील रक्ताभिसरण, श्वासोच्छ्वास आदींच्या क्षमतावर्धनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यामुळे शारीरिक स्वास्थ्य व तंदुरुस्ती दीर्घकाळ टिकविणे शक्य होते.

यावेळी डॉ. सेथ स्केल्टन यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रीडा शिक्षण कशा पद्धतीने घेता येते, खेळाडूंना आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी काय करावे, याचे मार्गदर्शन केले. पल्लवी देसाई यांनी विविध विद्यापीठांमध्ये पदवी व पदव्युत्तर क्रीडा व शारीरिक शिक्षण कसे प्राप्त करता येते, त्यासाठी लागणारी कागदपत्रे आणि तांत्रिक बाबींविषयी मार्गदर्शन केले. डॉ. शरद बनसोडे यांनी वेबिनारचे संचालन केले. यशस्वी आयोजनासाठी अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक गौरेश पवार, अक्षय कारेकर, डॉ. रोहित पाटील, पृथ्वीराज सरनाईक, सुचय खोपडे यांनी परिश्रम घेतले.

सकाळ

# खेळाडूंनी तंदुरुस्तीकडे लक्ष द्यावे : डॉ. फ्रँक बी. व्हेट

## शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय वेबिनार

कोल्हापूर, ता. १८ : क्रीडापटूंनी शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक तंदुरुस्तीकडेही जाणीवपूर्वक लक्ष द्यावे. खेळताना उद्भवणाऱ्या ताणतणावांचा सामना जितक्या सहजतेने करता येईल, तितका खेळ उंचावणे शक्य होईल. त्या दृष्टीने त्यांच्या प्रशिक्षकांनी त्यांच्या मानसिकतेवर काम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील टेक्सास येथील मिड वेस्टर्न स्टेट विद्यापीठाचे प्राध्यापक व क्रीडातज्ज्ञ डॉ. फ्रँक बी. व्हेट यांनी काल येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आणि मीड वेस्टर्न स्टेट युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने काल (दि. १७) सायंकाळी ६ ते १० या कालावधीत 'कॉम्पिटिटीव्ह स्पोर्टस् अँड ग्लोबल ऑपॉर्च्युनिटीज्' या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले. यात डॉ. व्हेट हे 'फिजिऑलॉजिकल थ्रेशोल्ड इन ट्रेनिंग दि कॉम्पिटिटीव्ह स्पोर्टस्' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. फ्रँक व्हेट म्हणाले, 'भारतीय क्रीडापटू आणि प्रशिक्षक व मार्गदर्शक हे क्रीडापटूंच्या शारीरिक तंदुरुस्तीवर काम मोठ्या प्रमाणावर करतात. पण, त्यांचा भर हा केवळ स्नायूंच्या पिळदारपणावर आणि सक्षमतेकडे अधिक असते. तसे करणे योग्यच आहे. मात्र, त्याच्या बरोबरीने शरीरातील विविध संस्था, जसे की, रक्ताभिसरण, श्वासोच्छ्वास आदींच्या क्षमतावर्धनाकडेही लक्ष द्यावे.'

डॉ. सेथ स्केल्टन यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रीडा शिक्षण कशा पद्धतीने घेता येते, खेळाडूंना आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी काय करावे, याचे मार्गदर्शन केले. पल्लवी देसाई यांनी विविध विद्यापीठांमध्ये पदवी व पदव्युत्तर क्रीडा व शारीरिक शिक्षण कसे मिळवता येते, याबाबत मार्गदर्शन केले. अयोजन क्रीडा अधिविभागाने केले. डॉ. शरद बनसोडे यांनी वेबिनारचे संचालन केले. अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक गौरेश पवार, अक्षय कारेकर, डॉ. रोहित पाटील, पृथ्वीराज सरनाईक, सुचय खोपडे यांनी परिश्रम घेतले.

19 JUL 2023

जनसंपर्क कक्ष
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे ५१२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे विविध ५१२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत.

विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सध्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी एम. ए. मास कम्युनिकेशन, एम.ए., एम.एस्सी. (भूगोल), एम.ए. (मानसशास्त्र), डिप्लोमा इन टुरिझम अँड ट्रॅव्हल्स, एम.एस्सी. (अॅप्लाईड केमेस्ट्री) आदी ११ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. दरम्यान, मंगळवारी मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ फार्मसी आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला १५७८ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकाकडून सातारा जिल्ह्यातून दोन गैरप्रकारांची नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.



तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत प्रवेशपूर्व पुर्नपरीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अनेक विषयांची प्रवेशपूर्व परीक्षा घेण्यात आली होती. यापैकी २३ अभ्यासक्रमांच्या जागा शिल्लक असल्याने मंगळवारी प्रवेशपूर्व पुर्नपरीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी ५६४ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला होता. त्यापैकी ५०३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ६१ विद्यार्थी गैरहजर होते. ही परीक्षा सकाळी १० ते ११.३०, दुपारी १ ते २.३०, दुपारी ३ ते ४.३० अशी तीन सत्रात घेण्यात आली. एमएस्सी फिजिक्स, स्टॅटीस्टिक, बॉटनी, प्राणीशास्त्र, इलेक्ट्रॉनिक, बीजेसी, बीलिप, एमबीए, एम. ए. मास कम्युनिकेशन, एमएस्सी बायोकेमेस्ट्रि, बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल यासह २३ विषयांची प्रवेशपूर्व परीक्षा झाली.